# मुंबई विद्यापीठ

क्र.युजी/५०/२०१४

**परिपत्रक :-**

मुंबई विद्यापीठाच्या विभागांचे विभाग प्रमुख, संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक-नि-संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था आणि समन्वयक रत्नागिरी उपकेंद, समन्वयक ठाणे उपकेंद्र हयांना असे सुचित करण्यात येते की, विद्वत परिषदेच्या दिनांक ७ जून, २०१३ रोजी झालेल्या सभेतील बाब क्र. ७.२ नुसार केलेल्या शिफारसीबाबत व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ११ जुलै, २०१४ रोजी झालेल्या सभेतील बाब क्र. २० च्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१४-१५ च्या प्रथम सत्र मार्च/एप्रिल २०१५ पासून पदवीपूर्व प्रमाणपत्र व पदवीका तसेच पदव्युत्तर प्रमाणपत्र या परीक्षांचे परीक्षापूर्व परीक्षा घेणे व परीक्षोत्तर ही सर्व कामे विद्यापीठाच्या वतीने संबधित महाविद्यालय/विभाग/संस्था करतील व या परीक्षांचे निकालपत्रे संबधीत महाविद्यालय/ विभाग/संस्था तयार करुन तपासणीसाठी व परिक्षा नियंत्रकाच्या मंजुरीसाठी परिक्षा विभागातील निकाल कक्षाकडे पाठवतील व संबधीत महाविद्यालय/विभाग/संस्था यांनी गुणपत्रक व प्रमाणपत्र यांची विहीत शुल्क विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाकडे अदा केल्यानंतर विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील गुणपत्रक व प्रमाणपत्र विभागाकडुन संबंधित परिक्षांचे गुणपत्रक व प्रमाणपत्र देण्यात येतील. परीक्षा फी च्या शेअर संदर्भात विद्यापीठाचे परिपत्रक क्र. Exam.Fee/149 of 2012-13, दि. १९ मार्च, २०१३ नुसार एकुण परीक्षा फी च्या २०% फी चा भरणा विद्यापीठाकडे करावा.

संबधित परिक्षासाठीचे परीक्षकांचे रेमुनरेशन (मानधन) संबधित महाविद्यालय/विभाग/संस्था विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे अदा करतील.

27/11/14

कुलसचिव

मुंबई - ४०० ०३२

दि. २७ नोंव्हेंबर, २०१४

प्रति,

मुंबई विद्यापीठाच्या विभागांचे विभाग प्रमुख, संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक-नि-संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था आणि समन्वयक रत्नागिरी उपकेंद, समन्वयक ठाणे उपकेंद्र.

**विद्वत परिषद सभा न. ७.२/०७/०६/२०१३**

**व्यवस्थापन परिषद सभा न.२०/११/०७/२०१४**

***************

**क्र.युजी/५०-अ/२०१४** **मुंबई - ४०० ०३२** **दि. २७ नोंव्हेंबर, २०१४**

**प्रत रवाना माहिती करिता:-**

**१. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,**

**२. समन्वयक, विद्यापीठ संगणक केंद्र,**

**३. परीक्षा नियंत्रक**

27/11/14.

कुलसचिव

PTO